नियमित दिवाणी दावा क्र. ७९/२०२५
शिवाजी विरुद्ध वसंत

**नि.दि.दा.क्र. ७९/२०२५ मधील निशाणी क्रमांक १६ वरील आदेश**

**शिवाजी विरुद्ध वसंत**

**CNR NO. MHSN070007042025**

प्रस्तुतचा दावा तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जासह दाखल करण्यात आला आहे. निशाणी क्र. ५ वरील तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जावर प्रतिवादींना नोटीस बजावण्याचा आदेश झालेला आहे. त्यानंतर वादीने दावा मिळकतीची जैसे-थे परिस्थीती ठेवण्याबाबत आदेश मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा व अर्जाचे नोटीसची बजावणी प्रतिवादी यांना झालेली असून त्यांनी हजर होवून नि.क्र. १९ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर केलेले आहे. वादीस मंडळअधिकारी कुची यांनी नोटीस देवून दि. ०६.०८.२०२५ रोजी हजर राहण्याबाबत कळविल्याने वादीच्या विनंती अर्जावरुन प्रस्तुत प्रकरण आजरोजी आदेशासाठी बोर्डावर घेण्यात आले आहे.

०२. प्रस्तुतचा दावा मामलेदार न्यायालयाच्या रस्ता खुला करुन देण्याच्या आदेशाविरुध्द दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुत अर्जात कथन केले की प्रतिवादी यांनी तहसिलदार कवठेमहांकाळ व प्रांत अधिकारी मिरज यांच्याकडून वादींच्या विरोधात मौजे कुची येथील गट नं. ८१६ मधून रस्ता खुला करुन मिळणेबाबत हुकूम मिळविलेला आहे. सदरचा न्यायनिर्णय मुलतः बेकायदेशिर आहे. सदर अर्जामध्ये वादी पक्षकार नसल्यामुळे तथाकथीत रस्ता खुला करुन देण्याबाबतचा आदेश पूर्णतः बेकायदेशिर आहे. सदर रस्ता केल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे जैसे थे आदेश राहणे आवश्यक आहे. जैसे थे परिस्थिती राहिल्यास त्यामध्ये प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादींच्या कथनानुसार तहसिलदार प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार नाहीत त्यामुळे

त्यांचेविरुद्ध कोणताही आदेश देता येणार नाही. सदरचे आदेश बेकायदेशीर आहेत हे ठरविणे करीता दावा गुणदोषावर चालविणे आवश्यक आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०४. वादीच्या कथनाप्रमाणे, मामलतदार यांच्या आदेशाची अंमलबजावणी अदयाप झालेली नाही. प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दिलेला असून सदर अर्जावर अद्याप सुनावणी होणे बाकी आहे. परंतु आजरोजी वादीने काही कागदपत्रे सादर केली आहेत. त्यामध्ये दि. १५.०७.२०२५ रोजी मंडळ अधिकारी कुची यांनी वादीस दिलेली नोटीस सादर केलेली आहे. सदर नोटीस नुसार दि. ०६.०८.२०२५ रोजी जायमोक्यावर रस्ता खुला करुन देणेबाबत वादीस हजर राहणेसाठी कळविलेले आहे. प्रस्तुत दाव्यातील कथनानुसार वादीने सदरचा आदेश बेकायदेशीर असल्याचे जाहीर होवून मागितलेले आहे. वादीतर्फे सादर कागदपत्रावरुन प्रस्तुत दाव्याचा विषय असणारा रस्ता होत असल्याचे दिसत आहे. प्रस्तुत दाव्यातील वादीच्या कथनानुसार केस नं. रस्ता/४४/२०१७ मध्ये वादींचे वडील भगवान आकाराम पाटील मयत असताना त्यांचे वारस रेकॉर्डवर घेवून त्यांचे म्हणणे न घेता अर्ज निकाली काढलेला आहे. सदर निकालाविरुद्ध वादीने सदर केलेला फेरतपासणी रिव्हीजन अर्ज क्र. ५६०/२०२३ नुसार तहसिलदार यांच्या निकालास स्थगिती देण्यात आली होती व तहसिलदार यांना फेरचौकशी करण्याबाबत आदेशीत केले होते. त्यानुसार तहसिलदार यांनी दि. १३.०३.२०२५ फेरचौकशी क्र. २७/२०२५ अन्वये वादींना नोटीस काढून हजर राहण्याबाबत कळविले होते. त्या अन्वये वादी नेमलेली तारीख दि. २४.०३.२०२५ रोजी हजर झाले असता प्रतिवादी मयत वारस रेकॉर्डवर घेणे असा शेरा ठेवून पुढील तारीख दि. २८.०४.२०२५ नेमलेली होती. परंतु सदर वारस रेकॉर्डवर न घेता दि. २९.०४.२०२५ रोजी सदरचे प्रकरण बंद करण्यात आल्याचे वादीला कळविले आहे. सदरच्या बाबी वादीतर्फे दाखल कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी दिसून येत आहेत.

०५. वादीने सादर केलेला दावा कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे हे अद्याप ठरलेले

नाही. अशा परिस्थिती आजरोजी वादींचा दावा चालण्यास पात्र नाही असा निष्कर्ष काढून अर्ज फेटाळल्यास सदरची बाब अन्यायकारक ठरेल. याउलट अर्ज मंजूर करुन जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिल्यास त्यामध्ये प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अभिलेखावरील परिस्थिती विचारात घेता वादीचे अधिकार संरक्षीत करणे गरजेचे आहे. अन्यथा वादींच्या शेतमिळकतीस नुकसान पोहोचल्यास दाव्याचे कारण संपुष्टात येईल. करीता प्रतिवादींनी जैसे-थे परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश करणे उचित ठरते. "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश न केल्यास वाद मिळकतीच्या परिस्थीतीबाबतचा गुंता निर्माण होईल व वादींच्या हक्कास बाधा पोहोचेल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो-

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींना आदेशित करण्यात येते की वादमिळकतीची परिस्थीती पुढील तारखेपर्यंत जैसे-थे ठेवावी, त्यामध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल करु नये.

३. सदर निकालाची नोंद वादी व प्रतिवादी यांनी घ्यावी.

४. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2025.07.24 16:36:51 +0530

**( एम. ए. कुलकर्णी )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

कवठेमहांकाळ

**दिनांक** २४.०७.२०२५

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | P. R. Patankar |
| Court | : | Jt. CJJD and JMFC, Kavathemahankal. |
| Date | : | 24.07.2025 |
| Order signed by P.O. on | : | 24.07.2025 |
| Order uploaded on | : | 24.07.2025 |